दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ थे | अंक : २५ वा | बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### पीआय हेमंत पाटील यांना जामिन

**धुळे ।** एलसीबीचे माजी अधिकारी पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांना न्यायालयाने अटी शर्ती घालत जामीन मंजुर केला आहे. आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर एका पिडीत महिलेने विनयभंग आणि अत्याचाराची फिर्याद देवपूर पोलिसात दाखल केली होती. त्यानंतर पीआय हेमंत पाटील यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर जामिनासाठी पीआय पाटील यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायमूर्ती यासमिन देशमुख यांच्यासमक्ष पीआय पाटील यांची बाजू ॲड. निलेश मेहता यांनी मांडली. न्यायालयाने त्यांना जामीन मंजुर केला आहे.

### नकाणे रोड भागात दुचाकीस्वारांवर कारवाई

**धुळे ।** शहरातील नकाणे रोडवर बेदरकारपणे दुचाकी चालविणाऱ्या पाच जणांवर पश्चिम देवपूर पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्यावर गुन्हे नोंद झाले आहेत. याबाबत हवालदार किरणकुमार साळवे, सुनील राठोड यांनी फिर्यादी दिली. संशयित सहा जण भरधाव वाहन चालवून लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने वाहन चालविताना पोलिसांना मिळून आले.

# आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होता का?
# संजय शिरसाठ यांचा पृथ्वीराज चव्हाणांना सवाल

**नाशिक । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीवरून सरकारवर टीका करणाऱ्या माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राज्यात आमचे सरकार असते तर आत्तापर्यंत मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावला असता, असे चव्हाण म्हणाले होते. त्यांच्या याच टीकेला उत्तर देतांना, आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होता का?, असा खोचक टोला शिरसाट यांनी चव्हाणांना लगावला आहे.

पृथ्वीराज चव्हाणांच्या टीकेला उत्तर देतांना शिरसाट म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेली ४० वर्षे मराठा समाज भांडत आहे. तेव्हा तुम्ही झोपले होते का? मुख्यमंत्री होते ना? आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होते का? असे शिरसाट म्हणाले. तर, लखवा मारलेले मुख्यमंत्री असं शरद पवार तुम्हाला म्हणायचे, तुम्ही काय शिकवतायत. शिंदे सरकारच्या धास्तीमुळे हे पोपट आता बोलायला लागले असल्याचे देखील शिरसाट म्हणाले आहेत.

मी मुख्यमंत्री असताना सहकार क्षेत्रात घेतलेल्या निर्णयामुळे २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने आमचं सरकार पाडलं. जर त्यावेळी आमचं सरकार पडलं नसतं तर आम्ही नक्कीच मराठा आरक्षण टिकवलं असतं. मला खात्री आहे की माझं सरकार जर पडलं नसतं, तर आम्ही दोघे राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस आम्ही एकत्रित निवडणुकीला सामोरे गेलो असतो आणि २०१४ मध्ये भाजपऐवजी आमचेच सरकार आले असते, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेला देखील संजय शिरसाट यांनी उत्तर दिले आहे. अडीच वर्षात घरात बसणारे आज मुख्यमंत्र्यांची लाज काढतायत हे दुर्दैव, हा मोठा विनोद आहे. अवकाळी पाऊस येणार म्हणजे छत्री धरायची होती का? , यांना शेतीतील काही कळत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कालच पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. अनेक मंत्री आज बांधावर आहेत. एक दिवस आमचे मंत्री प्रचाराला गेले तर यांना त्रास होतो आणि हे अडीच वर्षात घरात बसले होते. यांना ना शेतकऱ्याचा कळवळा, ना आरक्षणाच्या प्रश्नावर घेणं देणं आहे. फक्त टोमणे मारणे हा तुमचा स्वभाव झाला आहे. मुख्यमंत्र्यांचा आदर करायला शिका, काम न करता लोकं आपल्या पाठीशी आहेत हे त्यांचं स्वप्न भंग होणार आहे. आगामी लोकसभा, विधानसभेत त्यांची जागा पहायला मिळेल, असेही शिरसाट म्हणाले.

राज्यातील आमचं सरकार व्हीसीवर नाही, शेतात आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना माहिती आहे की, सरकार आमच्या पाठीशी आहेत. आम्हाला आमच्या राज्याचा लावलौकीक देशात वाढवायचा आहे. चौकट तोडून आम्ही काय करू शकतो हे देशाने बघितले. पण, तुम्ही जे राज्य चालवले हे जनतेने बघितले आहे, असेही शिरसाट म्हणाले.





### वाद पेटू नये या भूमीकेत सरकार आहे

**वाद पेटू नये या भूमीकेत सरकार आहे. जाती-जातीत भांडण होऊ नये या भूमिकेत सरकार काम करते आहे. सरकार अलर्ट मोडमध्ये आहे. कोणत्याही समजाचे घटक दंगल करणाऱ्या प्रयत्न करणारे असतील, तर त्यांना रोखल्याशिवाय राहणार नाही मग तो कोणीही असेल, असेही शिरसाट म्हणाले.**

### भुजबळांवर निशाणा

**मराठा कुणबी प्रमाणपत्र नोंदी शोधण्यासाठी सरकराने गठीत केलेली शिंदे समिती तत्काळ रद्द करण्याची मागणी ओबीसी नेते तथा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. यावरून शिरसाट यांनी भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. शिंदे समितीबाबतचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला आहे. त्याची अमलबजावणी शिंदे समिती करते आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करायची की नाही हे कॅबिनेट ठरवेल, मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्यामुळे त्यांच्यासमोर मागणी करायची ना?, असा टोला शिरसाट यांनी भुजबळांना लगावला आहे.**

# अद्वय हिरे यांचा मुक्काम कोठडीतच

### न्यायालयाचा दिलासा नाहीच, जामीन फेटाळला

**नाशिक । प्रतिनिधी**



रेणुका सूत गिरणी कर्ज फसवणूक प्रकरणी मालेगाव न्यायालयाने शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांचा जामीन अर्ज फेटाळला. अद्वय हिरे यांनी यांच्यावरील गुन्ह्याचा तपास प्रगतीपथावर आहे, त्यामुळे हिरे यांना आता जामीन दिल्यास ते साक्षीदारांवर दबाव टाकू शकतात असा युक्तिवाद नाशिक जिल्हा बँकेच्या वकिलांनी न्यायालयासमोर मांडला होता. त्यानंतर न्यायालयाने त्यांचा जामीन फेटाळला.

नाशिक जिल्हा बँकेच्या वकिलांनी युक्तिवात करताना सांगितलं की, अद्वय हिरे यांनी घेतलेले ७ कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज आज ३२ कोटीपर्यंत पोहोचले आहे. यातील एकही हप्ता हिरे यांनी भरलेला नाही.तसेच ते पैसे ज्या सूत गिरणीसाठी घेतलेले होते पण तिथे न वापरता इतरत्र वापरले. म्हणून त्यांच्यावर एमपीआयडी अंतर्गत गुन्हा दाखल आहे. अद्वय हिरे यांना जामीन नाकारल्यानंतर त्यांच्या समर्थकांचा चांगलाच हिरमोड झाला. तसेच त्यांचा जामीन नाकारल्याने ठाकरे गटाचा मोठा धक्का बसल्याचं सांगितलं जातंय.

अद्वय हिरे यांच्या विरोधात रमजानपुरा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक ग्रामीण पोलिसांनी त्यांना भोपाळवरून अटक करून न्यायालयासमोर हजर केले. त्यावेळी त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. मुदत संपल्यानंतर पुन्हा त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सुमारे दीड तास चाललेल्या दोन्ही युक्तीवादानंतर बँकेला सुट्टी असल्याने कर्ज प्रकरणात बँकेचे इतिवृत्त तपासणे बाकी आहे , कर्ज प्रकरणी अजूनही काही लोकांचे जबाब नोंदवणे बाकी असल्याचे कारण सांगून पोलिसांनी न्यायालयाकडे पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने पुन्हा त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, बँकेची ही केस सुमारे आठ वर्ष जुनी असल्याचं सांगण्यात येत आहे. याबाबत कायदेशीर प्रक्रिया सुरु आहे. सुरुवातीपासूनच आम्ही न्यायालयीन लढाई लढत असून न्यायव्यवस्थेचा पूर्ण विश्र्वास असल्याचे डॉ.अपूर्व प्रशांत हिरे यांनी यापूर्वी सांगितलं होतं.

# दुचाकी अडवून सात लाख लुटले; मुंबई आग्रा महामार्गावरील घटना

**धुळे । प्रतिनिधी**

पारोळा रोडवरील फागणे गावच्या शिवारातील ट्रक लुटीची घटना ताजी असताना आणि या प्रकरणातील आरोपींना अवघ्या काही तासात तालुका पोलिसांनी जेरबंद केलेले असतानाच रस्ता लुटीची दुसरी खळबळ जनक मुंबई-आग्रा महामार्गावर घडली आहे. पाठलाग करुन रोकडोबा हनुमान मंदिराजवळ तरुण व्यापार्याला गाठले. त्याला मारहाण करत चौघा लुटारुंनी त्याच्याकडील ७ लाखांची रोकड आणि मोबाईल हिसकावून पलायन केले.

याप्रकरणी चौघा लुटारुंविरुध्द धुळे तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे तालुक्यातील आर्वी येथील अनकवाडी रोड परिसरात राहणारे हितेश शंकर पाटील (वय २१) यांचा कापुस खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. ते दि. २७ रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास ७ लाखांची रोकड घेवून सहकार्यासह दुचाकीने आर्वीकडे जात होते. त्यादरम्यान अचानक त्यांच्या मागून दोन दुचाकींवरील चार अनोळखींनी त्याचा पाठलाग सुरू केला. रोकडोबा हनुमान मंदिराच्या अगोदर उतारावर चौघांनी ओव्हरटेक करीत व्यापारी पाटील यांना अडविले. त्यांच्यासह सहकार्याला खाली उतरवून जोराने धक्का देवून खाली पाडले. दोघांना हाताबुक्यांनी तोंडावर, पोटावर व पाठीवर जबर मारहाण करीत त्यांच्या हातातील ७ लाखांची रोकड असलेली पिशवी, ५ हजारांचा मोबाईल आणि दुचाकीची चावी जबरीने हिसकावून आर्वीच्या दिशेने पळून गेले. घटना घडताच व्यापारी हितेश पाटील यांनी धुळे तालुका पोलिसांना माहिती देत फिर्यादही दिली. त्यावरून चौघा अनोळखींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील हे करीत आहेत. घटनेची माहिती मिळताच एसपी श्रीकांत धिवरे, डीवायएसपी साजन सोनवणे, एलसीबीचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे व तालुक्याचे निरीक्षक प्रमोद पाटील यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

### पोलिसांकडून शोध सुरु

**मुंबई- आग्रा महामार्गावर घडलेल्या या घटनेनंतर धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्या संदर्भात धुळे तालुका पोलिसांतर्फे लूट करणाऱ्या चोरट्यांचा कसून शोध घेतला जात आहे. लवकरात लवकर या चोरट्यांच्या मुसक्या आवरल्या जातील; असा विश्वास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी व्यक्त केला आहे.**

# मनोरुग्ण रेल्वेच्या विद्युत खांबावर चढला

**नंदुरबार । प्रतिनिधी**

एका मनोरुग्णामुळे जवळपास दीड तास रेल्वे वाहतूक खोळंबल्याचा प्रकार नंदुरबार रेल्वे स्थानकात घडला. रेल्वेची उच्चदाब विद्युत वाहिनी असलेल्या खांबावर चढलेल्या मनोरुग्णाला वाचवण्यासाठी रेल्वे वाहतूक बंद ठेवावी लागली. विशेष प्रयत्न करुन त्याला खाली उतरविण्यात आले.

नंदुरबार रेल्वे स्थानकात सकाळी १० वाजेच्या सुमारास एक जण रेल्वेला विद्युत पुरवठा करणाऱ्या खांबावर चढल्याने एकच धावपळ उडाली. संबंधित प्रकार लोहमार्ग पोलिसांच्या लक्षात येताच सहायक पोलीस निरीक्षक रमेश वावरे यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने त्याला खाली उतरविण्याचा प्रयत्न केला. परंतु, यात संबंधिताच्या जीवाला धोका असल्याचे ओळखून स्थानकप्रमुखाच्या मदतीने उच्च दाबाचा वीज पुरवठा तत्काळ खंडित करण्यात आला. त्यानंतर संबंधित व्यक्तीला समजाविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तो उतरण्यास तयार नव्हता. रेल्वेच्या उच्चदाब विद्युत पुरवठा करणाऱ्या खांबावर चढलेला हा युवक उत्तर प्रदेशातील गोरखपूरचा रहिवासी असून रागातून तो घर सोडून निघून आल्याचे उघड झाले. जवळपास दीड तासांच्या प्रयत्नानंतर रेल्वे प्रशासनाने याठिकाणी ओएचचा विशेष डबा मागवून शिडीच्या सहाय्याने डब्यावर त्याला उतरविण्यात आले. नंतर रेल्वे सुरक्षा दलाने ताब्यात घेवून त्याची चौकशी केली. एक मनोरुग्ण व्यक्ती मंगळवारी सकाळी रेल्वेच्या हाय टेन्शन लाईनवर चढला. यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. त्यामुळे भुसावळ ते सुरत दरम्यानची रेल्वे सेवा विस्कळीत झाली. वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे रेल्वे वाहतूक पूर्णपणे बंद झाली. आणि सर्व रेल्वे जागेवरच थांबल्या होत्या. त्यानंतर सदर मनोरुग्णाला हाय टेन्शन लाईनवरून खाली उतरवण्याचे प्रशासनाने प्रयत्न सुरु केले.

# संत रविदास गार्डन निर्मितीत मोठा भ्रष्टाचार!

### ठेकेदाराला काळ्या यादीत टाका : उबाठा शिवसेनेची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात पांझरा चौपाटीवर संत रविदास गार्डनची निर्मिती दोन वर्षांपूर्वी करण्यात आली. यावेळी या कामाचे इस्टीमेट ५ कोटींचे होते. त्यात महापालिकेने भर टाकून विशेष निधीतून २ कोटी रुपयांमध्ये लेजर शो व कारंजे बसविले. या गार्डनचे नुकतेच उद्घाटनही झाले. मात्र या गार्डनमध्ये पुरेशा सोयीसुविधा नसल्याने मोठा भ्रष्टाचार या गार्डन निर्मितीत झाला आहे. त्यामुळे या कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. मनपाने आधीच ठेकेदाराला ५ कोटीचे बिल अदा केलेले आहे. आता विशेष निधीमधून २ कोटींचे बिल अदा केले जाणार आहे, ते त्वरीत थांबविण्यात यावे व संबंधीत ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी उबाठा शिवसेनेतर्फे उपायुक्त संगिता नांदुरकर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, रस्ते व गटारी करणार्या ठेकेदाराला हे काम दिल्यामुळे या गार्डनमध्ये लहान मुलांसाठी कुठल्याही प्रकारची खेळणी इतर साहित्य तसेच नागरिकांसाठी बसण्यास बाके ठेवण्यात आलेली नाहीत. या गार्डनमध्ये पाण्याची कुठलीही सुविधा नसून कारंजे कुठल्या पाण्यावर चालतील हा प्रश्न आहे. संपूर्ण गार्डनमध्ये शोभेची तसेच फुलांची झाडे लावणे अपेक्षित असतांना या संपूर्ण गार्डनमध्ये वटवृक्ष लावण्यात आलेले आहेत. ७ कोटी रु. खर्चून या ठिकाणी सुंदर पंचतारांकित गार्डनची निर्मिती झाली असती. पण मनपातील अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे धुळेकर परत एकदा एका चांगल्या गार्डनला मुकले आहेत. या गार्डनला वाढीव २ कोटींचा निधी देतांना त्याची निविदा कधी प्रसिध्द झाली? संबंधीत लेझर शो व कारंजे यांचे काम कोणाच्या माध्यमातून देण्यात आले? त्यासाठी कोणत्या वर्तमान पत्रातून निविदा प्रसिध्द करण्यात आली? तसेच हे लेझर शो व कारंजे हाताळण्यासाठी मनपाकडून कोणत्या तंत्रज्ञाची नेमणुक करण्यात आली? याबाबत सर्व प्रश्न अनुत्तरीत असून या कामात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. या गार्डनमधील फरशी देखील तुटल्या आहेत. या संपूर्ण कामाची चौकशी करून संबंधीतांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देतांना शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, किरण जोंधळे,धीरज पाटील, डॉ.सुशील महाजन, भरत मोरे ,ललित माळी, लखन चांगरे, अण्णा फुलपगारे, मच्छिंद्र निकम, सुनील चौधरी, सुनील पाटील, महादू गवळी, संजय जवराज ,अमजद पठाण, संतोष शर्मा ,आदींची उपस्थिती होती.

# त्या धोकेदायक पुलावरून पडून पुन्हा एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

### अधिकारी व लोकप्रतिनिधींचे मात्र साफ दुर्लक्षच

**होळनांथे । योगेश पाटील**

अनेर नदीवरील होळनांथे-मोहीदा या धोकेदायक पुलावरून पुन्हा एका ज्येष्ठ नागरिकाचा तोल जाऊन जीव गमवावा लागला असून याबाबत अधिकारींसह लोकप्रतिनिधींचे मात्र दुर्लक्ष दिसून येत आहे.

शिरपूर तालुक्यातील होळनांथे तर चोपडा तालुक्यातील मोहीदा या धुळे व जळगाव जिल्ह्याला जोडणाऱ्या अनेर नदीवरील पूल नेहमीच चर्चेचा विषय होत असला तरी याकडे मात्र संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींचे पूर्णतः दुर्लक्ष दिसून येत असून परिसरातील गावांमधील ग्रामस्थांनीच लोक चळवळ तयार करून, आंदोलन करून सदर धोकेदायक पुलाचे काम मार्गी लावावे अशी, मागणी आता परिसरातून जोर धरत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, होळनांथे-मोहीदा या गावाला जोडणारा अनेर नदीवर पूल बांधण्यात आला आहे. पहिल्याच पावसात पूलाचे कठडे पूर्णतः वाहून गेले होते तर पुलावर ठिकठिकाणी सिमेंट (स्लॅब) निघून लोखंडी सळया बाहेर निघाल्या आहेत. यामुळे सदर पुलावरून वाहनधारकांसह पायी जाणार्यांनाही विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून पाच ते सात जणांना पुलावरून पडून जीव गमवावा लागला असल्याचेही परिसरातील ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. तरी सदर धोकेदायक पुलाची दुरुस्ती होऊन पूलावर संरक्षण कठडे बसवणार का ? अशी संताप जनक हाक परिसरातील ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.




### पंढरपूरला निघाले होते आप्पा

**मोहिदा तालुका चोपडा येथील वसंत डूमन पाटील (गुजर) उर्फ आप्पा हे घरातून पंढरपूर जाण्यासाठी निघाले होते. होळनांथ्याहून शिरपूर जायला सकाळी ०६:०० वाजेला पहिली बस असल्याने पहाटेच आप्पा घरातून निघाले होते. परंतु पुलावरून जात असतांना, पूलाला संरक्षण कठळे नसल्याने आप्पांचा तोल गेल्याने ते नदीत कोसळले, त्यांना तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र चार दिवसानंतर दिनांक २६ नोव्हेंबर रोजी आप्पांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्यावर मोहिदा येथे अंतिम संस्कार करण्यात आला.**

### तर जीव वाचला असता

**सदर पुलाच्या दुरावस्थेबाबत जवळपास सहा महिन्यापूर्वीच दैनिक लक्ष महाराष्ट्रामध्ये सविस्तर वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. सदर वृत्ताची दखल म्हणून परिसरातील सोशल मीडियावर विविध प्रतिक्रियाही देण्यात आल्या होत्या. मात्र याकडे अधिकारी व लोकप्रतिनिधींनी मात्र सर्रासपणे दुर्लक्ष दिल्यानेच पुन्हा एका ज्येष्ठ नागरिकास जीव गमावा लागला असल्याने परिसरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

# कामगार संघटना कृती समितीचे धुळ्यात ठिय्या आंदोलन

**धुळे । प्रतिनिधी**

संपुर्ण राज्यात दुष्ळाळ जाहीर करा, महागाईवर नियंत्रण आणा, यासह विविध १५ मागण्यांसाठी कामगार संघटना कृती समिती, धुळे च्यावतीने शहरातील क्युमाईन क्लबसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यासंदर्भात जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्र्यांसह पंतप्रधानांच्या नावे निवेदन देण्यात आले. राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आ वासून उभी असतांना शासन केवळ जाती धर्माच्या मोर्चा मेळाव्यांना परवानग्या देत आहे. शेतकर्यांसह श्रमिकांच्या मुलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मात्र मोर्चास परवानगी नाकारण्यात येत आहे. राज्य सरकार व पोलीस प्रशासनाची ही लोकशाही विरोधी कृती असून या विरोधात दाद मागण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जाणार असल्याचा इशाराही कामगार संघटना कृती समितीने निवेदनातून दिला आहे. तसेच शेतकर्यांसह कामगार व श्रमिक वर्गाचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्यात यावे, या प्रमुख मागणीसह १५ विविध मागण्या निवेदनातून मांडल्या आहेत. निवेदनावर कॉ.एल.आर. राव, कॉ.पोपटराव चौधरी, कॉ. साहेबराव पाटील, कॉ.शरद पाटील, कॉ.दीपक सोनवणे, कॉ. आसिफ शेख, एस.यु.तायडे, अशोक चौधरी, डॉ.संजय पाटील, राहुल अहिरे, जे.आर.सूर्यवंशी, बी.पी. गिरासे, संजय गिरासे, विविध संघटनांच्या पदाधिकार्यांची नावे व स्वाक्षर्या आहेत.

## जम्मू-काश्मीरमधील आव्हान

अफगाणिस्तान-पाकिस्तान सीमेवर निर्वासितांच्या प्रश्नामुळे युद्धजन्य स्थिती आहे. बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वा हे प्रांत अशांत आहेत. तरीही काश्मीरप्रश्न धगधगता ठेवण्याची पाकिस्तानची खुमखुमी कायम आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया पुन्हा वाढल्या आहेत. कर्जबाजारी होऊन जगात नाचक्की झाली, तरी पाकिस्तानची जुनी खोड कायम आहे, हा त्याचा अर्थ! जम्मू-काश्मीरमधील राजौरी आणि पूंछ हा सीमेवरचा भाग दहशतवाद्यांनी आपल्या कारवायांसाठी निवडल्याचे गेल्या काही दिवसांतील घडामोडींवरून स्पष्ट होते. राजौरी जिल्ह्यात लष्कराचे दोन कॅप्टन आणि दोन जवान दहशतवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत हुतात्मा झाले. त्याआधी अनंतनाग जिल्ह्यात दहशतवाद्यांबरोबर लढताना एक कर्नल, एक मेजर आणि एक पोलिस अधिकारी यांच्यासह चौघांना वीरमरण आले. नियंत्रण रेषेजवळ दहशतवादी घुसखोरीचा प्रयत्न करतात, त्यांना रोखण्याच्या भारतीय सुरक्षा दलाच्या प्रयत्नांत अडथळे आणण्यासाठी नजीकच्या पाकिस्तानी चौक्यांमधून गोळीबार केला जातो. अनंतनाग जिल्ह्यातील घनदाट जंगलांचा फायदा उठविण्याचा दहशतवाद्यांचा प्रयत्न असतो. ३७० वे कलम रद्द झाल्यावर पाकिस्तानने थयथयाट केला, तरी जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या दहशतवादी कारवाया घडविण्यात पाकिस्तानला यश आले नव्हते. आता वाढलेल्या कारवायांकडे आव्हान म्हणून पाहावे लागेल. कोणत्याही स्थितीत जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाचे पुनरुज्जीवन होता कामा नये. गेल्या दोन वर्षांमध्ये दहशतवाद्यांबरोबर ज्या - ज्या चकमकी झाल्या, त्यात मारले गेलेल्यांमध्ये सुरक्षा दलातील जवान आणि अधिकारी, त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांची संख्या अधिक आहे! ही सर्वाधिक चिंतेची बाब म्हणावी लागेल.

पूंछ आणि राजौरीमध्ये झालेल्या चकमकीतील लक्षणीय बाब म्हणजे दहशतवाद्यांमध्ये असलेला पाकिस्तानातील निवृत्त सैनिकांचा सहभाग. भारताविरुद्ध कारवाया करणार्या दहशतवादी संघटनांमागे पाकिस्तानी लष्कर आहे. पाकिस्तानी लष्कर हेच समस्येचे मूळ आहे, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. भारतीय लष्कराच्या उत्तर विभागाचे प्रमुख, लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी त्यावर प्रकाश टाकला आहे. भारत-पाकिस्तान एकत्र येऊन जोपर्यंत चर्चा करत नाही तोपर्यंत चकमकी थांबणार नाहीत, असे मत जम्मू - काश्मीरचे माजी मुख्य मंत्री फारूख अब्दुल्ला यांनी व्यक्त केले. जम्मू-काश्मीर दहशतवादमुक्त करण्याची केंद्र सरकारची ग्वाही प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही ही वस्तुस्थिती. मात्र, फारुख अब्दुल्ला यांच्यासारख्यांची भूमिका अतार्किक आहे. मुंबईवरील हल्ल्याचे सूत्रधार पाकिस्तानात खुलेपणाने फिरताना त्याबद्दल पाकिस्तानला खडे बोल सुनावण्याची फारुख यांची मानसिकता दिसली नाही. भारताविरुद्ध छुपे युद्ध करणार्या पाकिस्तानशी चर्चा करून दहशतवादी कारवाया कशा थांबणार? जम्मू-काश्मीरचा विषय आंतरराष्ट्रीय पटलावर कसा जिवंत राहील, हेच पाकिस्तानकडून पाहिले जाते. याचे कारण तेथील सत्ताकारणात या मुद्द्याला भावनिक स्वरूप देता येते आणि सामान्यांची दिशाभूल करणे सोपे ठरते. पाकिस्तानी लष्कर आणि तेथील राज्यकर्ते यांना जम्मू-काश्मीरची खरोखरच चिंता असती, तर व्याप्त काश्मीरमधील नागरिकांवर मोर्चे काढून कैफियत मांडण्याची वेळ आली नसती. तेथे शिया समुदायावर पाकिस्तानी लष्कराकडून अनन्वित अत्याचार होत आहेत. सीमा खुली करा आणि आम्हाला भारतात जाऊ द्या, ही शिया समुदायाची मागणी आहे. त्या असंतोषाकडे दुर्लक्ष व्हावे आणि देशांतर्गत अस्थैर्य, महागाईच्या झळा यावरून नागरिकांचे लक्ष विचलित व्हावे हे पाकिस्तानसाठी महत्त्वाचे ठरते. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये वाढलेल्या दहशतवादी कारवायांकडे पाहावे लागेल. येत्या निवडणुकांमध्ये नवाझ शरीफ यांचे सत्तेवर पुनरागमन होणे ही औपचारिकताच दिसते. राज्यकर्ते बदलले तरी पाकिस्तानचे अस्तित्व भारतद्वेष असल्याने धोरणात बदल कठीण दिसतो. अशावेळी दहशतवादी कारवायांना चोख उत्तर देण्यासाठी अधिकाधिक दक्षता बाळगण्याशिवाय भारतासमोर पर्याय नाही.

# अवकाळीचा तडाखा अन् शेतकरी



महाराष्ट्राच्या अनेक भागांत पुन्हा काल अवकाळी पावसाने यावेळी तडाखा दिला असून खासकरून नाशिक भागात त्याचा तडाखा सर्वात जास्त बसला आहे. यावेळी नाशिक जिल्ह्यात जास्तच नुकसान झाले असून मोठ्या प्रमाणात द्राक्षबागांचे नुकसान झाले आहे. नाशिकमध्ये द्राक्ष बागांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. महाराष्ट्रात गेल्या महिनाभरापासून ८० टक्के अवकाळी पावसाची नोंद झाली असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांत सतत सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नाशिक भागातील द्राक्ष उत्पादनाला जबर फटका बसला असून, कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात येते. अवकाळीमुळे राज्यभरात सर्वत्र शेतीचे नुकसान झाले आहे. नाशिक भागात वायनरी उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. त्यालाही या अवकाळीचा फटका बसला आहे. अवकाळी पावसामुळे वायनरी उद्योगाचे मोठे नुकसान झाले आहे. नाशिकला 'द्राक्ष पंढरी' म्हटले जाते. पण याच नगरीत आता तेथील द्राक्ष उत्पादक शेतकर्‍यांचा नुकसानामुळे खर्च वाढला आहे. हवामान बदल हे एक कारण या स्थितीसाठी आहे.

हवामान बदलाच्या या आविष्कारांमुळे शेतकर्‍यांना सर्वात जास्त नुकसान सोसावे लागत आहे. पॅरिस येथे झालेल्या हवामान परिषदेत हवामान बदलाच्या परिणामांचे निराकरण करण्यासाठी सर्व देशांनी खर्च करण्याचा निर्णय घेतला होता. पण अमेरिकेने त्यातून नंतर अंग काढून घेतले. पण हवामान बदलाच्या संकटांचा सामना सध्या जास्तीत जास्त शेतकरी वर्गालाच करावा लागत आहे. द्राक्ष बागा फुलोर्‍यात असतानाच द्राक्ष उत्पादक शेतकर्‍यांना अवकाळीचे संकट भेडसावत आहे. नाशिक जिल्हा हा द्राक्ष पंढरी म्हणून ओळखला जात असून तेथे २० टन प्रतिहेक्टर या प्रमाणानुसार १० लाख टन द्राक्ष उत्पादन होते. ८००० हेक्टर जमिनीचा उपयोग वेगवेगळ्या द्राक्षाच्या जातींचे उत्पादन घेण्यासाठी केला जातो. आता यातील बहुतेक द्राक्ष उत्पादन मातीत गेले आहे. महाराष्ट्र हेच भारतात द्राक्ष पिकवणारे सर्वात मोठे राज्य आहे. पण येथे शेतकर्‍यासमोर गेल्या महिनाभरापासून अवकाळीचे संकट आ वासून उभे आहे. राज्यात एकूण देशातील द्राक्ष उत्पादनापैकी ८१ टक्के उत्पादन केले जाते. नाशिक जिल्हा हा वाइन कॅपिटल म्हणून ओळखला जातो. एकट्या नाशिक जिल्ह्यात २५ वायनरी सध्या सुरू आहेत. यामुळे नाशिक जिल्ह्याने द्राक्ष राजधानी म्हणून लौकिक प्राप्त केला असला तरीही अवकाळीमुळे द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. द्राक्ष उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. देशात वाइनची विक्री वाढली आहे आणि त्यामुळे द्राक्षाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. पण हे सारे चांगले घडत असतानाच अवकाळीच्या संकटाने उद्योगाला वेढून टाकले आहे. वायनरी उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होत असल्याने अवकाळीमुळे नुकसान झाल्याचा दुष्परिणाम वाढत्या बेरोजगारीवर होण्याची शक्यता आहे. एक शेतकरीच संकटात सापडलेला नाही, तर इतरही अनेक घटक या अस्मानी संकटामुळे अडचणीत आले आहेत.

अवकाळीचे संकट आता नेहमीचे झाले आहे. त्यात आता नवीन काही राहिले नाही. त्यामुळे शेतकर्‍यांना आता या संकटाशी तोंड देण्यास तयार राहिले पाहिजे. राज्य सरकार आता पाहणी करून द्राक्षबागांच्या उत्पादकांना भरपाई देईल. पण त्यासाठी पंचनामे करावे लागतील. त्या प्रक्रियेत कितीतरी वेळ जाईल. पण सरकारने आता लवकर शेतकर्‍यांच्या नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे, तरच शेतकर्‍यांना भरपाई लवकर मिळेल. अवकाळीमुळे द्राक्षबागांचे नुकसान प्रचंड झाले आहे, कित्येक एकरावर बागा आडव्या झाल्या आहेत. कितीतरी बागांची द्राक्ष फुलोर्‍यात असतानाच नष्ट झाली आहेत. हे नुकसान फार मोठे आहे. राज्याच्या इतर भागांतही पावसाने शेतकर्‍याचे नुकसान केले आहे. पण नाशिकमध्ये जे द्राक्षांचे नुकसान झाले आहे, ते फार मोठे आहे. द्राक्ष राजधानीत अशा प्रकारे नुकसान होणे हा राज्याच्या अर्थव्यवस्थेला फार मोठा झटका आहे आणि त्यामुळे राज्याच्या प्रगतीवरही परिणाम होणार आहे. नाशिकची अर्थव्यवस्था संपूर्ण द्राक्षबागांवर चालते. त्यातच अवकाळीने तडाखा दिल्याने तीच कोसळण्याच्या बेतात आली आहे. पण याचा सर्वात वाईट परिणाम असा होणार आहे की, नाशिकमधून देशाचे जे अर्धे द्राक्ष उत्पादन निर्यात केले जाते. त्याला फटका बसण्याची शक्यता आहे. त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेलाही झटका बसणार आहे. ६५ हजार टन द्राक्ष उत्पादन निर्यात केले जाते. त्यामुळे देशाला कितीतरी अधिक परकीय चलन मिळते. पण आता हे नुकसान लक्षणीय आहे.

द्राक्ष बागांचा अभ्यास केला असता असे दिसते की, निर्यात होणारे उत्पादन जास्तीत जास्त अमेरिका आणि इतर युरोपीय देशांना जाते. तेव्हा द्राक्षबागांचे नुकसान हे संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान आहे. त्याशिवाय रशिया आणि चीन याही भारतातील द्राक्ष उत्पादनांच्या मोठ्या बाजारपेठा आहेत. आता शेतकरी यातून कसे सावरणार हा प्रश्न आहे. सरकार त्यांना मदत करेल आणि ते पुन्हा आपल्या पायावर उभे राहतील. पण त्या प्रक्रियेला विलंब होईल. भारतात द्राक्ष पिकाचे नुकसान नेहमीचेच आहे आणि त्यामुळे द्राक्ष बागा जळून जाण्याचा धोकाही मोठा असतो. नाशिक जिल्हा हा द्राक्षांसाठी प्रसिद्ध असला आणि एकट्या नाशिक जिल्ह्यात राज्यातील ५५ टक्के उत्पादन होत असले तरीही शेतकर्‍यांचे प्रश्न सारखेच आहे. जे मराठवाडा किंवा विदर्भातील शेतकर्‍याचे प्रश्न आहेत तेच नाशिकमधील शेतकर्‍याचे आहेत. अवकाळी पाऊस हा आता निसर्गातील नियमित होणारा प्रकार झाला आहे आणि त्यामुळे त्याच्याशी तोंड देण्याच्या उपाययोजना सरकारने केल्या पाहिजेत. अवकाळी पाऊस हा नित्यनियमाने येऊन शेतीची नासाडी करत आहे. हवमान बदल यावर हा विषय सोडून देता येणार नाही. नाशिकच नव्हे तर अकोला, यवतमाळ आणि इतर कित्येक शेतीबहुल प्रांतात त्याने धुमाकूळ घातला आहे.

# भगवंत कल्पनेच्या पलीकडे


**मनुष्याचा स्वभावच असा असतो की, आपल्या कल्पनेत जेवढे येते तेवढेच आपण सत्य मानतो. पण आपली कल्पनाच किती संकुचित असते, याचा कोणी विचार करीत नाही. जो कल्पनेच्या पलीकडे आहे, जिथे कल्पना थांबते, ज्याला कल्पना बांधू शकत नाही, त्याला कल्पनेने कसे ओळखता येईल?**



जो ज्ञानाच्या पलीकडे राहिला आहे त्याला माझ्या तोकड्या ज्ञानाने कसे अजमावता येणार? माझ्या बुद्धीच्या पलीकडे तो आहे. तेव्हा त्याच्या इच्छेनेच त्याचे खरे ज्ञान होणार आहे. अविद्या ती हीच की, आपल्या कल्पनेने होणारे ज्ञान हेच खरे मानणे. याकरिता श्रद्धा आणि कल्पना यांतला फरक ओळखावा. खरी श्रद्धा तीच की जी कल्पनेच्या पलीकडे राहते. प्रल्हादाइतके आपण नामाला सत्यत्व देत नाही. कल्पनेची मजल प्रल्हादाने नाही चालविली. कल्पनेच्याही पलीकडच्या गोष्टी जर आपल्या य:कश्चित् संसारातसुद्धा घडतात, तर भगवंत त्या कल्पनेच्या पलीकडे राहिला असे मानायला काय हरकत आहे?

सूर्यप्रकाश जसा सर्व ठिकाणी भरलेला असतो, त्याप्रमाणे देवळात, घरात, तीर्थक्षेत्रांत, सर्व ठिकाणी परमात्मा भरलेला आहे. परमात्मा फक्त विद्वानांचा किंवा श्रीमंतांचा नसून तो सर्वांचा आहे. भगवंत सर्वांचा आहे, म्हणूनच सर्वांना तो सुसाध्य असला पाहिजे. एखादा मोठा गणिती हिशेब लवकर करू शकतो; परंतु खेडेगावातले अडाणी लोक गणित न शिकताही हिशेब बरोबर करतात, आणि त्यांचा व्यवहार बरोबर चालतो. तसे विद्वानाला कदाचित् भगवंत लवकर प्राप्त होईल, पण अडाणी माणसालादेखील तो प्राप्त होऊ शकेलच. भगवंताची दृष्टीच अशी आहे की, त्याला आपले अंत:करण स्पष्ट दिसते. ते जसे असेल त्याप्रमाणे भगवंत आपल्याला जवळ किंवा दूर करतो. मनुष्य जन्माला आला की सगळी नाती त्याला आपोआप येतात, त्याचप्रमाणे, परमात्मा आनंदरूप आहे असे म्हटले की बाकीचे सर्व गुण त्यामध्ये आले असे समजावे. जसा मारुतीमध्ये देवअंश होता तसाच तो आपल्यामध्येही आहे. त्याने तो फुलविला. पण आपण झाकून तो विझवून टाकला, याला काय करावे? मामलेदाराला बरोबर असलेल्या शिपायाची भीती वाटत नाही, चोराला मात्र त्याच्याबरोबर असलेल्या शिपायाची भीती वाटते. त्याचप्रमाणे भगवंत आपल्या पाठीमागे आहे ही जाणीव ज्याला असते, त्याला उपाधीची भीती वाटत नाही, कारण ती त्याच्याच इच्छेने आली आहे, अशी त्याची खात्री असते. आपण आपले मागले घडलेले सर्व भगवंताला अर्पण करावे, मग पुढची जबाबदारी त्याच्यावर पडते. जे निश्चित नाही त्याचे नाव कल्पना होय. देव आहे असे नि:शंकपणाने वाटणे, हे ज्ञान होय.

## शब्दकोडे-२४५



**आडवे शब्द**

१. गुन्हा ५. करमणूक करणारे ८. सडपातळ ११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी! १२. गुजराथी नृत्य प्रकार १४. वर्तुळ १६. भरभराट १९. मुरली, बासरी २०. धोबी २१. सैन्यातील एक हुद्दा २३. घागरा २४. बर्फाचा पर्वत २५. अभय देणे २७. श्रीमंत २८. वहिवाट, शेत २९. संपणे ३०. चुकीचे ३१. करार, भिस्त ३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी ३५. स्वच्छ ३७. घर ३९. विपत्तीची कहाणी ४१. कणसातील दाणे ४३. सज्जनगडचे संत ४४. सार, अर्थ ४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी ४६. वर-वधू ४८. सरहद्द ४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला ५३. युद्ध ५५. लहान ५६. वेल ५८. जादू, भ्रम ५९. बाळाची बोलगाणी ६३. अतिशय हाल ६५. पावसाची झड ६६. राज्यघटना (हिंदी) ६७. गेरु ६८. पडते घेणे ७०. माया, प्रेम ७१. विविध ७३. संध्याकाळ ७४. हनुमान ७५. झकास, सुंदर ७६. राजकारणी यात्रा! ७७. रड्या माणूस ७८. मौल्यवान साठा

**उभे शब्द**

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत २. राजाचा कालावधी ३. मोठ्ठीच गंमत ४. ऐट, दिमाख ५. वर्ण ६. सोन्याचा धागा ७. '--- में हड्डी' ८. रस्ता, पर्थ ९. जिवलग मित्र १०. समशेर १३. लोकांचा समूह १५. नवरा १७. रत्न १८. सूर्य, तापविणारा १९. स्वयंपाकाचे शास्त्र २२. सामान २४. थंडीचे दिवस २५. प्राण २६. आशीर्वाद २७. सावकार, श्रीमंत २८. उत्तराधिकारी २९. शाब्दिक हजामत ३२. दरवाजा ३३. हालचाल ३४. खरकट्याची रास ३६. पळून गेलेला ३८. हिंदीत दहा ४०. ओटा ४२. कर्ण ४४. तमाशा कलाकार ४७. उगाच भटकणे ४९. हस्त ५०. सर्वस्व ५१. भोळा (शंकर) ५२. लोखंडी वस्तूवरील गंज ५४. अभिप्राय ५७. चंद्र ५८. ममता, प्रेम ६०. डोंगर उतरण, ढाळ ६१. डासाचे चावणे ६२. गीत ६४. मिठी ६६. अनुमती, मान्यता ६८. टक, दृष्टी ६९. सहाय्य ७०. वारा ७१. बाई, स्त्री ७२. श्वान ७४. मुलांच्या भाषेत मांजर ७५. सिंहाचे पिल्लू

### शब्दकोडे-२४४ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

**उभे उत्तर**

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात

## सोभाव (सुत्र २६)

## आत्मबल आनी व्यक्तिमत्त्व



डॉ.रा.प्र.पारनेरकर

व्यक्तीनं व्यक्तिमत्त्व वा सामुदायिक व्यक्तिमत्त्व यानामुये आपलं व्यक्तिमत्त्व कंपित न व्हता अचल -हास.या सोभावना गुन विशेषलेच आत्मबल आसंम्हनतस.हरकले आसं आत्मबल -हास नै. कारन याना प्राप्तिना करता लागनारं तप सर्वसाधारनपने मनपआशईन करत नैत. ज्यास्ले या आत्मबलना फायदा व्हयेल -हास त्या समदासले आत्मबल बी सारखं -हात नै. अशा श्रीमहात्माजीसारखा एखादाच -हास ७५टक्का आत्मबल ज्यास्ले प्राप्त व्हयेल शे आशा बी खूपच कमी शेतस. मोठा नावाजले अशा ज्या -हातस त्या बी ५०-५०टक्कापेक्षा जास्ती -हातस नैत.३० टक्क्यांपर्यंत आत्मबल असनारा मानसे बरीच दखाले भेटतस.सर्वसाधारन समाजम्हा कर्तबगार म्हनीसन वयखनारा बी २० टक्का त्यासन आत्मबल -हास.हाई आत्मबल जसं भेटाले लागथस तसंच ते जागरूकपने टिकावी आनी वाढ बी त्यानाम्हाकरनी पडस. जठे आत्मबलनी वाढ रोखली जास तठे त्याना परगतीना मारगबी खुटी जास. रोखाई जास. आत्मबल हाईच या मानानं जीवन म्हातल मुख्य बल शे.हाई जर नै व्हनार ते बाकी समदा कितलाबी बल झायात ते त्या काही उपेग व्हत नै.जठे आत्मबल व्हस तठेच यश बी हमखास घालीसन येस.आत्मबलना अभावे इतर बलसना जीवनम्हा जोयजे तसा उपेग व्हत नै.प्रपंच संसार आनी परमार्थ या दोन्ही कडे आत्मबल -हावावनै ते त्या मानूस जीवन वाया जास.तधय आपलं व्यक्तिमत्त्व कोनासमोर कितला परमानम्हा कंपीत व्हस यान पयले मोजमाप ल्हिसनी मंगच त्यामानले तसं व्यवहारसंग वापराले जोयजे. ज्यांना व्यक्तिमत्त्व ना ठसा होईसन आपलावर पडत -हास.त्याना पन व्यक्तिमत्त्व वर आपलं दुबळ कमजोर व्यक्तीमत्व आपली काही परमानम्हा ठसा छाप पाडत - हास.जगमा असा एक बी मानूस नै की ज्यांना व्यक्तिमत्त्वनी छाप दुसरावर पडह,पन त्यानावर मातर कोनीच छाप पडत नै. कारन संस्कार करनं आनी करी लेन हाऊच खरा मानूसना मनना धर्म शे.तव्हय या दोन्ही गोष्टी सारख्याच चालत -हातीस . परंतु आपलं व्यक्तिमत्त्व कोठे कंपित व्हत नै ते कसं ,व्हत ह्यानी बारकाईने पाहणी परीक्षा कराले जोयजे.आपले व्यक्तिमत्त्व कोनत्याबी परिस्थितीमा अचल स्थिर ठेवनं हाईच आत्मबल प्राप्तीनं मुख्य ध्येय शे. ज्याले आत्मबल शे त्याले सर्वकाही शे..

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# निओ मेट्रो प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मंत्रालयात तातडीने बैठक घ्या : गोडसे

नाशिक । प्रतिनिधी

शहराच्या विकासासाठी आणि भविष्यात उद्भवणाऱ्या भीषण वाहतुकीच्या कोंडीवर मात करण्यासाठी तयार करण्यात आलेला निओ मेट्रो प्रकल्प गेल्या दोन वर्षांपासुन अंतिम मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. सदर प्रकल्प शहरासाठी अत्यंत गरजेचा असून प्रकल्पातील अडीअडचणींवर चर्चे द्वारे मार्ग काढण्यासाठी प्रकल्पाच्या संबंधित सर्व विभागांची एकत्रित बैठक मंत्रालयात आयोजित करावी. अशी आग्रही मागणी खा.हेमंत गोडसे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



नाशिक शहर आणि परिसरात भविश्यात होणारी वाहतुकीची कोंडी लक्षात घेऊन गेल्या काही वर्षांपासून खा. गोडसे यांनी शहरात मेट्रो व्हावी यासाठी प्रयत्न सुरू केलेले आहे. निओ मेट्रो प्रकल्पाला सन २०१९ साली महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिलेली आहे. पुढील मान्यतेसाठी राज्य शासनाने प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेला आहे. निओ मेट्रोसाठी मुंबई - नाका, सीबीएस, अशोक स्तंभ, गंगापुर आणि गंगापुर सातपुर एमआयडीसी, त्र्यंबकरोड, सीबीएस अशा दोन मार्गिका असणार असून सीबीएस ते नाशिकरोड रेल्वे स्थानकापर्यंत सिंगल मार्गिका असणार आहे. केंद्र शासनाकडून या प्रस्तावाला आता फक्त अंतिम मंजुरी मिळणेच बाकी आहे.

केंद्र शासनाने राज्य शासनाकडून आलेल्या या प्रस्तावाची सविस्तर स्कूटनी करून आवश्यक त्या त्रुटी पुर्ण करून घेतलेल्या आहेत. परंतु वर्ष उलटुनही प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. सदर प्रकल्प मार्गी लावण्यासाठी खा. गोडसे यांनी काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष पत्र पाठविले आहे. मेट्रोची एकूण लांबी बत्तीस किलोमीटर होती. मधल्या काळात बत्तीसपैकी सुमारे अकरा किलोमीटरचे पहिल्या टप्प्यात काम पुर्ण करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली होती. मात्र द्वारका ते दत्तमंदिर हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे येत असल्याने आपण वाहतुकीच्या दृष्टीने डबल डेकर करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. मेट्रोच्या प्रस्तावात राष्ट्रीय महामार्गाचा कोठेही उल्लेख नसल्याने विसंगती जाणवत आहे. मेट्रो प्रकल्प शहरासाठी अत्यंत गरजेचा असून प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी संबंधित सर्व विभागांची एकत्रित बैठक मंत्रालयात आयोजित करावी अशी आग्रही मागणी खा. गोडसे यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना भाजपातर्फे अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपा मध्य मंडलातर्फे भाजपा वसंतस्मृती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीष पालवे, सुरेश पाटील, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जाधव बोलतांना सांगितले की, आपला भारत देश समाज, जाती, धर्म यावर आधारलेल्या असून याला योग्य रस्ता दाखविण्याचे काम सर्व समाज सुधारकांनी केले. मात्र यात महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

याप्रसंगी सुरेश पाटील, प्रतिक शुक्ल, सुजाता करजगीकर, वसंत उशीर आदींची भाषणे झाली. यावेळी सरचिटणीस ड.शाम बडोदे, अरुण शेंदुर्णीकर, नंदकुमार देसाई, प्रदिप पाटील, संगीता जाधव, राकेश पाटील, अनिता भामरे, सुजाता जोशी, सुनिल जाधव, प्रकाश कांबळे, महेश भामरे, देवेंद्र चुंभळे, विजय कुलकर्णी, सदानंद तायडे, धनंजय सोनवणे आदी उपस्थित होते.

## मधुमेह, उच्चरक्तदाबमुळे किडनी विकाराच्या समस्यांमध्ये वाढ : डॉ. केळकर

नाशिक । प्रतिनिधी

जीवनशैलीचा दैनंदिन जीवनमानावर होणारा बदल तसेच उच्च रक्तदाब आणि मधुमेहामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पीटलचे किडनीविकार तज्ञ देवीकुमार केळकर यांनी केले.

डॉ. देवीकुमार केळकर म्हणाले की, सकाळी उठल्यावर डोळ्याभोवती सुज येणे, चेहरा किंवा पायावर सुज येणे, लघवीमध्ये रक्त किंवा प्रोटीन जाणे, लघवी करतांना त्रास होणे यासारखे लक्षणे दिसल्यास तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेळीच निदान होऊन योग्य उपचार घेतल्यास पुढील आजार टाळता येणे शक्य असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. श्रध्दा ज्येष्ठ नागरिक संघ म्हसरूळ यांच्यातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात डॉ. केळकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे सचिव देवकिसन व्यास, उपाध्यक्ष पुरुषोत्तम पांडे, कोषाध्यक्ष डी.टी. कुलकर्णी, जितेंद्र येवले उपस्थित होते.

# शिक्षकेतरांचा आश्वासित प्रगतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार: आ. दराडे

जुने नाशिक । प्रतिनिधी

आगामी अधिवेशनात राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा आश्वासित प्रगती योजनेचा प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाईल. यासाठी सर्वप्रथम १२ व २४ वर्षांची वेतनोन्नती लागू होणे महत्त्वाचे असल्याने यासाठी रेटा सुरू आहे. लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार असल्याची माहिती नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी दिली आहे. जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर महासंघाच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना त्यांनी ही माहिती दिली. मेळव्याच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे राज्याध्यक्ष वाल्मीक सुरासे होते.



सारडा सर्कल येथील नॅशनल उर्दू कॅम्पसमध्ये आयोजित या मेळाव्याप्रसंगी जिल्हाभरातील शेकडो शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम नॅशनल उर्दू कॅम्पस व्यवस्थापन मंडळाकडून संस्थेचे अध्यक्ष हाजी बबलू पठाण व सचिव प्रा. जाहिद शेख यांच्याहस्ते आ. किशोर दराडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे खजिनदार गौसनूर खान, सोहेल शेख, प्राचार्य तौसिफ शेख आदी उपस्थित होते. दरम्यान शिक्षण क्षेत्रातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे नाशिक जिल्हा सर्वत्र बदनाम झाला आहे. अनेक वेळा विधान परिषदेत हजेरी लावताना या प्रश्नावरून लाज वाटते. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार संपला पाहिजे, यासाठी शिक्षण दरबार भरविण्याचा निर्धार केलेला असून यापुढे शिक्षण दरबारात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपली गाऱ्हाणी मांडावीत, असे आवाहन आ. दराडे यांनी यावेळी केले.

नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावी, यासाठी मी आग्रही भूमिका घेतली आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. देशातील अनेक छोट्या राज्यांनी जुनी पेन्शन मंजूर केलेली असताना महाराष्ट्र सारख्या राज्याने ही मागणी अद्याप का मंजूर केली नाही? याचे आश्चर्य वाटते, असे ते म्हणाले. दरम्यान शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत प्रशासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा सुरू आहे. काही शिक्षक आमदार यांना देखील या प्रश्नांची जाणीव करून देण्यात आली आहे. यामुळे येत्या अधिवेशनात कर्मचाऱ्यांचा बारा व चोवीस वर्षांचा वेतनश्रेणीचा प्रश्न हमखास मार्गी लागण्याची शक्यता असल्याची माहिती महासंघाचे प्रदेशाध्यक्ष वाल्मीक सुरासे यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महासंघाचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ धात्रक यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षकेतर महासंघातील नवनियुक्त तालुकाध्यक्ष व सचिव यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी महासंघाचे प्रदेश महासचिव पाराजी मोरे, अहमदनगर जिल्हाध्यक्ष समशेर पठाण, मुख्याध्यापक संघटनेचे सचिव एस. बी. देशमुख, प्रयोगशाळा महासंघाचे विभागीय अध्यक्ष संग्राम करंजकर, ज्येष्ठ नेते रामनाथ थेटे, ज्येष्ठ मार्गदर्शक संजय देवरे, सचिन डोंगरे, महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप औटे, सचिव लियाकत पठाण आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन भाऊसाहेब बोराडे यांनी केले. मेळावाच्या यशस्वीतेसाठी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष जयश्री जोगदंड, अरुण मानकर, सचिन मुंढे, महेश बच्छाव, खालीद शेख, तनवीर शेख, नईम शेख, शाहिद खान, आरिफ खान, मुदब्बीर सय्यद, जावेद शेख, आसिफ शेख, फारूक शेख आदींनी परिश्रम घेतले.

---

ॲड. अनिल गवळी
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे कोर्टात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३६२/२०२३**

काशिनाथ झिपरू चौधरी .....**अर्जदार**
**विरुध्द**
कोणीही नाही ...**जाबदेणार**
कै. झिपरू सोनू चौधरी ....... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट न. २ धुळे यांचे कडे दि. २१/११/२०२३ रोजी कि. दि. अर्ज नं. १३६२/२०२३ चा अर्ज कै. झिपरू सोनू चौधरी रा. अन्नापुर्णा मु.पो. कापडणे ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. झिपरू सोनू चौधरी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. ०८/०१ / २०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. २ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूवी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे
दि.२४/११/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे**

---

ॲड.कविता बी. रोकडे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो. धुळे यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३६१/२०२३**

विठाबाई उत्तम पाटील .....अर्जदार
।। वि.।।
कोणीही नाही .....जाबदेणार
कै. उत्तम नागो पाटील ...... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट न. १ धुळे यांचे कडे दि. २१/११/२०२३ रोजी कि. दि. अर्ज नं.१३६१/२०२३ चा अर्ज कै. उत्तम नागो पाटील रा. यशवंत नगर मु. पो. कापडणे, ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. उत्तम नागो पाटील माळी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. ०५/०१/ २०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. १ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूवी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २४/११/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे**

---

प्रोसेज जमा ॲड. अनिल जी. जगताप / ॲड. दिपराज एम. पाटील

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. ७११/२०२२**

१) श्री. भालचंद्र बाबुलाल देसले, वगैरे- ..अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .....जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२० अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट)

मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय के स्तर साक्री येथे दि. १४/१२/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार व सामनेवाला नं. १ ते ६ हे सर्व सख्खे भाऊ बहीण आहेत. अर्जदार नं. १ ते ५ यांचे वडिल नामे कै. बाबुलाल बेडू देसले यांचे दिनांक २७/०३/२०२१ रोजी मौजे साक्री ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. भालचंद्र बाबुलाल देसले (मुलगा), २. श्री. लहू बाबुलाल देसले (मुलगा), ३. श्री. दिलीप बाबुलाल देसले (मुलगा), ४. श्री. सतीश बाबुलाल देसले (मुलगा), ५. सौ. किरण संदिप नांद्रे (मुलगी)

वरील अर्जदारांशिवाय मयतास दुसरे कोणतेही वारस नाहीत.

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने घरील वारसांव्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. ५ / १ /२०२४ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहिशिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकून** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कोर्ट, साक्री** **दिवाणी न्यायालय कोर्ट, साक्री**

---

ॲड. शशिकांत आर. पाटील, धुळे
नि.५

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ९९०/२०२३**

१. प्रभावती लक्ष्मण सोनवणे, उ. व. ५९ वर्ष, धंदा - घरकाम
२. योगेश लक्ष्मण सोनवणे, उ. व. ३८ वर्ष, धंदा नोकरी
३. अमोल लक्ष्मण सोनवणे, उ. व. ३२ वर्ष, धंदा- नोकरी
नं. १ ते ३ रा. प्लॉट नं. १३०, श्री हरी कॉलनी, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे.
४. भारती अनिल थोरात, उ. व. ४४ वर्ष, धंदा-घरकाम
रा. शिवाजी नगर, नायगाव, ता.
५. मनिषा आनंद चौधरी, उ. व. ३८ वर्ष, धंदा- घरकाम,
रा. प्लॉट नं. १३५ प्रभात नगरजवळ, विठ्ठल मंदिर, देवपुर, धुळे.
६. कल्पना प्रविण चौधरी, उ. व. ३६ वर्ष, धंदा - घरकाम
रा. प्लॉट नं. १३०. श्री हरी कॉलनी, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे.
७. सुजाता राजेंद्र चौधरी, उ. व. ३४ वर्ष, धंदा - घरकाम
रा. रूम नं. ४, चौधरी चाळ, उत्कर्ष नगर, पी. पी. रोड,
गणेश मंदिराजवळ, भांडुप (वे), मुंबई ...**अर्जदार**
आणि
कै. लक्ष्मण सुपडु सोनवणे (मयत)
मयत दि. २३/०३/२०१९
मृत्यु ठिकाण: श्री हरी कॉलनी, साक्री रोड,
धुळे, ता. जि. धुळे ......**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यानी उपरोक्त न्यायालयात कै. लक्ष्मण सुपडु सोनवणे (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ७ हे कायदेशीर वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय तसेच महसुल दप्तरी तसेच खाजगी कामाकरीता आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. ८ /८ / २०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १३/१२/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. ६. याच न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- / /२०२३ आदेशावरुन

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षके**
**दिवाणी न्यायालय सो.व स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय सो.व स्तर, धुळे**

---

प्रोसेज जमा ॲड. दिपराज एम. पाटील

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र.३८९/२०२३**

गं. भा. सुशिलाबाई गुलाबराव मोहने,उ.व. ७८, धंदा घरकाम
रा. मालपुर ता. साक्री जि. धुळे
ह.मु. पांझरा कॉलनी प्लॉ. नं. १९ साक्री ता. साक्री
.... अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .... जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला

( हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री येथे दिनांक २२/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की कै. गुलाबराव पुंजू मोहने यांचे दिनांक ०७/०९/२०२३ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) ग.भा. सुशिलाबाई गुलाबराव मोहने २) ग. भा. सिंधुबाई गुलाबराव मोहने ३) श्री. त्र्यबंक गुलाबराव मोहने ४) श्री. जगदिश गुलाबराव मोहने ५) श्री. हेमंत गुलाबराव मोहने ६) सौ. सुरेखा भ्र. धुडकु जाधव ७) श्री. गंगाधर गुलाबराव मोहने ८) सौ. संगिता भ्र. रमेश रामोळे

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे. त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक १०/०१/२०२४ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल. सदर जाहिर नोटीस नोटीस. मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- / २०२३

**कामगिरी कारकून** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर, साक्री**

---

ॲड. दिनेश उत्तम फुले, धुळे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३५४/२०२३**

१. नर्मदाबाई दौलत परदेशी, उ.व. धंदा - घरकाम
२. लता भगवान परदेशी, उ.व. ५१, धंदा - घरकाम,
३. छकुली भगवान परदेशी, उ. व. २३, धंदा -शिक्षण
४. गणेश भगवान परदेशी, उ. व. २१, धंदा - शिक्षण
सर्व रा. मोतीनगर, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे
.....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ... सामनेवाला
आणि
कै. भगवान दौलत परदेशी (मयत)
मृत्यु दि. १०/०९/२०२३
मृत्यु ठिकाण धुळे, ता. जि. धुळे .... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. भगवान दौलत परदेशी (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय, अनुकंपतत्वावरील नोकरीकरीता तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं. १ ते ४ हे कै. भगवान दौलत परदेशी (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. २०/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०२/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. २. याचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २४/११/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.** **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

## न्यूज कॉलम

### रोटाव्हेटरमध्ये पाय अडकून तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** रोटाव्हेटरमध्ये पाय अडकून गंभीररत्या जखमी होऊन तरुणाचा मृत्यू झाला. राहुल गुलाबराव भामरे (वय २९, रा. मैंदाणे, ता. साक्री) असे त्याचे नाव आहे. तो घरासमोरील अंगणात रोटाव्हेटरचे (एमएच १८ बीआर ६८१४) काम करीत होता. रोटाव्हेटर अचानक सुरू झाल्याने त्यात उजवा पाय अडकून राहुल याचा अपघात झाला. त्याचा उजवा पाय, डाव्या हातासह तोंडाला व इतर ठिकाणी गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. तो स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाला म्हणून त्याच्यावर पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.

### महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी

**धुळे ।** तालुक्यातील बभळाज येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरा करण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मुख्याध्यापक एस. ए. कुरेशी यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक एस. ए. कुरेशी यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली व मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून आर. यु. चौधरी, पी. एस. पाटील उपस्थित होते. उपशिक्षिका सौ. जान्हवी पाटील यांनी महात्मा फुले यांच्या विषयी माहिती दिली.

# जिल्हा परिषद अध्यक्षा अश्विनी पाटील यांचा विकास कामांचा धडाका सुरू!

### शिरडाने प्र.डांगरी येथे म्हसोबा मंदिर परिसरातील सभामंडपाचे भूमिपूजन

**धुळे । प्रतिनिधी**



तालुक्यातील शिरडाने प्र.डांगरी येथे जिल्हा परिषद अध्यक्षा इंजि.सौ. अश्रि्वनीताई पाटील यांच्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून म्हसोबा मंदिर परिसरातील सभामंडपाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. गावाची मागणी आणि निकड लक्षात घेऊन गावात विकासकामांचा धडाका सुरू असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

शिरडाने प्र. डांगरी येथे दरवर्षी म्हसोबा महाराजांची यात्रा भरते. अनेकांचे श्रद्धास्थान असलेल्या म्हसोबा मंदिर आणि परिसरात भाविक वर्षभरातून आपल्या मान मानता, नवस फेडण्यासाठी या ठिकाणी येत असतात. मात्र सभामंडप नसल्याने आलेल्या भाविकांची सातत्याने गैरसोय होत होती. ही गैरसोय टाळण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी जिल्हा परिषद अध्यक्षा इंजि.सौ अश्रि्वनीताई पाटील यांच्याकडे साकडं घातलं आणि या परिसरामध्ये सभा मंडप व्हावा अशी मागणी केली.जिल्हा परिषद अध्यक्षांचा मूळ उद्देश ग्रामस्थांची मागणी, गावाचे निकड यानुसार कामे दिली पाहिजेत हा असल्या कारणाने प्रा. अरविंद जाधव यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी हे सभागृह उभारण्याची कित्येक वर्षाची ग्रामस्थांची मागणी पूर्ण झाली.

या कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी गावचे उपसरपंच चुडामन यशवंत पाटील,रोहिदास बाबुलाल पाटील, ईश्र्वर नाना पाटील, छोटू पाटील रवींद्र, पाटील, साहेबराव कोळी, रावसाहेब कोळी, दगा लाला पगारे, सुकलाल मोतीराम जोशी ,साहेबराव बाबुलाल पाटील, रामेश्र्वर रामचंद्र जोशी, संतोष खंडू जोशी, सुरेश विश्र्वास पाटील, योगेश राजाराम पाटील, भटू राजेंद्र पाटील, मुकुंदा पाटील, भाईदास खंडू कोळी, निंबा पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अश्रि्वनीताई पाटील यांनी आपल्या जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावामध्ये विकासाची कामे झाली पाहिजेत, विकासाचा अनुशेष भरून निघाला पाहिजे ग्रामस्थांची मागणी लक्षात घेता आबाल वृद्धांच्या मागणीचा आदर करून गावकऱ्यांची जी निकड आहे त्याप्रमाणे विकासाचे काम देण्याचा सपाटा सुरू केलेला आहे.

जन सुविधा कार्यक्रमातून गावाच्या मुख्य रस्त्यालगत विद्युत पथदिव्यांचे काम या ठिकाणी सुरू झालेले आहे. शिवाय जलजीवन मिशनच्या माध्यमातून सुमारे ६९ लक्ष रुपयांच्या पिण्याच्या पाण्याचा योजनेचे देखील काम जिल्हा परिषद अध्यक्ष अश्रि्वनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यासाठी देशाचे माजी संरक्षण राज्यमंत्री विद्यमान खासदार डॉ.सुभाष भामरे यांचे मोलाचे मार्गदर्शन सौ.अश्रि्वनीताई पाटील यांना सातत्याने लाभत असते. खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या मार्गदर्शनाने आपल्या जिल्हा परिषद गटामध्ये अश्रि्वनीताई पाटील यांनी आपल्या कामाचा धडाका सुरू केलेला आहे. शिवाय शिरडाने ग्रामस्थांच्या मागणीनुसार प्रलंबित कामांमध्ये मुख्य रस्त्यालगत विद्युत पथदिवे बसविण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. ठक्कर बाप्पा योजनेतून नवनाथ मंदिर परिसरामध्ये सामाजिक सभागृहाचे काम हाती घेण्यात येणार आहे. शिवाय ग्रामस्थ आणि शेतकरी बांधवांची सगळ्यात मोठी जी अडचण होती की पांझरा नदीवरचा जो जुना केटीवेअर आहे , त्या केटीवेअरच्या पाट्या नसल्याच्या कारणांनी पांझरा नदीचे पावसाळ्याचे आणि अक्कलपाड्यातून सोडलेले सर्व पाणी वाहून जात होते. त्यामुळे शेतकरी आपली शेती सिंचनाखाली आणू शकत नव्हता . अशा परिस्थितीमध्ये प्राध्यापक अरविंद जाधव यांनी अथक प्रयत्नातून खा डॉ सुभाष भामरे व जिल्हा परिषद अध्यक्ष अश्रि्वनी पाटील यांच्या माध्यमातून केटीवेअर येथे पाट्या टाकल्या आणि त्यामुळे पंचक्रोशी मध्ये सुमारे पाच किलोमीटर पर्यंत पाणी भरून आहे,याचे देखील समाधान ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केले.

# पोलिस पाटलांच्या मागण्या अधिवेशनात मांडणार



### आ.कुणाल पाटील यांचे आश्वासन


**धुळे । प्रतिनिधी**

गावात शांतता आणि सलोखा राखणारा महत्वाचा दुवा म्हणून पोलिस पाटील असून त्यांच्या न्याय मागण्या अधिवेशनात माडणार.दरम्यान मुंबईतील धरणे आंदोलनास माझा पाठींबा असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी धुळे तालुका पोलिस पाटील संघाच्या पदाधिकार्यांना सांगितले.

राज्यातील पोलिस पाटलांचे दि.२८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर दरम्यान मुंबई येथे उपोषण व धरणे आंदोलन केले जात आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर धुळे तालुका पोलिस पाटील संघाने आ.कुणाल पाटील यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. पोलिस पाटलांचे मानधन २५ हजार रु.करण्यात यावे, ग्राम पोलिस अधिनियम १९६७मध्ये दुरुस्ती करण्यास प्राधान्य देण्यात यावे,पहिल्या पाच वर्षानंतर पुढचे नुतनीकरण कायमचे बंद करावे, शासनाकडून पोलिस पाटील व कुटूंबियांना मेडिक्लेमचा लाभ मिळावा,निवृत्तीचे वय ६५ वर्षापर्यंत करावे,निवृत्तीनंतर ठोस रक्कम १० लक्ष रुपये मिळावेत अशा विविध मागण्यांचे निवेदन यावेळी देण्यात आले.

पोलिस पाटलांच्या मागण्या अधिवेशनात मांडून आवाज उठविणार असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी शिष्टमंडळाला सांगितले. दरम्यान मुंबईतील पोलिस पाटलांच्या आंदोलनाला माझा पाठींबा असल्याचेही आ.कुणाल पाटील यांनी सांगितले.

# क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन









**धुळे । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त विविध पक्ष संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. धुळे शहरातील क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळेस विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने सावता माळी प्राथमिक शाळा धुळे अध्यक्ष रत्नाकर माळी, दशरथ महाले, नितीन भदाणे, मुख्याध्यापिका मीना अहिरे, प्रतिभा बाविस्कर, मृणालिनी बाविस्कर, डॉ.संजय शेलकर, सुनील रत्नकर महाजन, गणेश महाजन, घनश्याम मगरे, अशोक महाजन, रवींद्र शेळकर, राजश्री शेलकर, हर्षल मगरे, सिद्धार्थ जाधव, रघुनाथ महाजन, बाबूलाल महाजन,अरुण माळी, लोकक्रांती सेनेचे देवेंद्र पाटील, कैलास माळी, सुनील बिरारी, हनुमंत आप्पा वाडीले, विलासराव आण्णा माळी, विठ्ठल वाडीले, विजय जगताप, पी.एस.जाधव, बी.बी.महाजन अण्णा गजमल माळी, प्रा.अनिल बोरसे, प्रा.विलासराव पाटील, एस.टी.चौधरी, सुमित चौधरी, डॉ सुशील महाजन, धीरज पाटील, भारती माळी, अशोक माळी, आदी उपस्थित होते.

# चंद्रशेखर बावनकुळे यांची बाळासाहेब भदाणे यांच्या निवासस्थानी कौटुंबिक सदिच्छा भेट



**धुळे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या गुलमोहर निवासस्थानी कौटुंबिक सदीच्छा भेट दिली. यावेळी भदाणे परिवाराच्या वतीने श्री.बावनकुळे यांचा सुहृदय सन्मान करण्यात आला. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सध्या खान्देश दौर्यावर आहेत. यात ते विविध बैठका, समारंभ आदींना भेटी देत आहेत. आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढत, श्री.बावनकुळे यांनी बाळासाहेब भदाणे यांच्या निवासस्थानी कौटुंबिक सदिच्छा भेट दिली. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत यावेळी भाजपाचे महामंत्री विजय चौधरी, खा.डॉ.सुभाष भामरे, धुळे शहर विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल, धुळे जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, धुळे शहराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, जि.प.सदस्य राम भदाणे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, नगरसेवक चेतन मंडोरे, रावण भदाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर पाटील, जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे, डॉ. राजेंद्र भदाणे, बोरकुंड सरपंच हेमंत भदाणे, मा.सभापती पं.स. नारायण माळी, पंचायत समिती उपसभापती देवेंद्र माळी, पंचायत समिती सदस्य बाबाजी देसले, चेतन चौधरी, माजी पं.स.सदस्य सोपान पाटील, भिरडाणे सरपंच राजेश पाटील, धुळे भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी व बाळासाहेब भदाणे मित्र परिवार उपस्थित होते. यावेळी श्री.बावनकुळे यांनी कौटुंबिक चर्चांबरोबरच धुळे ग्रामिणच्या विकासात्मक अनुशेषाबाबत चर्चा केली. तसेच बाळासाहेब भदाणे यांच्या कुटुंबासोबत, अनौपचारिक आस्थेवाईक गप्पा केल्या. यावेळी भदाणे परिवाराच्या वतीने श्री.बावनकुळ यांचा सुहृदय सन्मान करण्यात आला.

# श्री गणपुले दत्त मंदिरात दिपोत्सवाचे आयोजन



**धुळे । प्रतिनिधी**

धुळ्यातील खोल गल्लीतील प्राचीन काळापासून असलेल्या श्री गणपुले दत्त मंदिर संस्थानात त्रिपुरी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदीराच्या प्रथेप्रमाणे दिपोत्सव पर्वाचे काल मंदिर सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ओम श्री गुरुदेव दत्त व स्वस्तिक ची सुंदर प्रतिकृती शेकडो पणत्यांच्या सहाय्याने साकारण्यात आली.

या दिपोत्सव पर्व प्रसंगी जेष्ठ वास्तु विशारद व धुळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा रावसाहेब रविजी बेलपाठक, सामाजिक कार्यकर्त्या सौ रेणुका ताई बेलपाठक, सुपरिचित बांधकाम व्यावसायिक व पिरॅमिड कन्स्ट्रक्शन्स संचालक संग्राम लिमये, आर्ट ऑफ लिव्हिंग चे साधक व प्रशिक्षक दिपक राव, साहित्यिका व कवी सौ वृंदा राव यांच्या शुभ हस्ते दत्त गुरूंची महाआरती करण्यात आली. या प्रसंगी श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान धुळे चे अध्यक्ष शरदचंद्र देशपांडे, कार्याध्यक्ष कु धनश्री गरुड, उपाध्यक्ष अनुप बनछोड, जेष्ठ विश्र्वस्त व प्रसिद्धी प्रमुख आनंद कुलकर्णी, व्यवस्थापक माधव बापट, पुरोहित कमलेश गाडगीळ उपस्थित होते. यावेळी सौ संध्या कुलकर्णी, माधुरी शुक्ल, प्राजक्ता बापट, जयाताई कापडी, राणू गरुड यांनी पणत्यांची सुंदर आरास फुलांसह साकारली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ बापट, सौ नमिता देशपांडे, सौ बनछोड, ऋषिकेश बापट यांनी परिश्रम घेतले. जेष्ठ विश्र्वस्त आनंद कुलकर्णी यांनी प्रसारमाध्यमांना श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान च्या वर्ष भरातील विविध धार्मिक उपक्रमांची माहिती दिली. या दिपोत्सव पर्वाच्या निमित्ताने मंदीराचा गाभारा व सभागृह शेकडो पणत्यांच्या रोषणाई ने उजळून निघाले होते.

# नांदेडच्या राज्यस्तरीय ज्युनिअर नेटबॉल स्पर्धेसाठी संघ जाहीर

### कर्णधारपदी केंद्रीयचा भविष्य वाघ तर पिंपळादेवीची गितांजली खैरनार

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र अँम्युचर नेटबॉल असोसिएशनच्या मान्यतेने, नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशनच्या वतीने दि.२८ ते ३० नोव्हेंबर २०२३ दरम्यान नांदेडच्या इंदिरा गांधी क्रीडा संकुलात होणाऱ्या १७ वी महाराष्ट्र राज्यस्तरीय ज्युनिअर नेटबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी शहराच्या मोहाडी उपनगरातील श्री. पिंपळादेवी विद्यालयाच्या मैदानावर जिल्हास्तरीय नेटबॉल निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली.

त्यातून जिल्ह्याचे मुले व मुलींचे (१९ वर्षे आतील) दोन्ही संघ निवड समिती सदस्य द्वारकाधिश माळे, आदित्य दहातोंडे व सोनिया गावडे यांनी निवड करून जाहीर केले. मुलांच्या संघाचे कर्णधारपद शहरातील केंद्रीय विद्यालयाचा भविष्य वाघ तर मुलींच्या संघाचे कर्णधारपद मोहाडी उपनगरातील श्री. पिंपळादेवी विद्यालयाची, गितांजली खैरनार यांच्याकडे सोपविण्यात आले. सहभागी होणारे दोन्ही संघ धुळे जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशनच्या वतीने जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. निवडलेले संघ पुढीलप्रमाणे मुले- भविष्य वाघ (केंद्रीय विद्यालय, धुळे) (कर्णधार), राजू साव (उपकर्णधार), सनी जाधव, सचिन उचाळे, रोनक पवार, गौरव पाटील, संकेत करंदीकर, प्रणव सोनवणे, विवेक पाटील, कृष्णा गावडे, निरज साव, प्रेमराज देवरे (सर्व पिंपळादेवी विद्यालय, मोहाडी) व्यवस्थापक अविनाश वाघ, प्रशिक्षक ऋत्विक ठाकूर, मुली-गितांजली खैरनार (कर्णधार), पिंपळादेवी विद्यालय, मोहाडी, ऋतुजा आव्हाड (उपकर्णधार), (एसएसव्हीपीएस कनिष्ठ महाविद्यालय, धुळे), कल्याणी पवार, वैभवी खैरनार, साक्षी पाटील, दिपाली शिंदे, हर्षाली पाटील, कल्याणी चव्हाण, पुर्वश्री वाघ (सर्व पिंपळादेवी विद्यालय, मोहाडी, भाग्यश्री बडगुजर (एसएसव्हीपीएस कनिष्ठ महाविद्यालय,धुळे), पल्लवी मराठे (कमलाबाई शं. कन्या शाळा, धुळे ) रोशनी सुर्यवंशी (सेंट अँन्स् इंग्लिश स्कुल,धुळे ) व्यवस्थापक-योगेश वाघ, प्रशिक्षक महेंद्र गावडे यांचा समावेश आहे. मा. नगरसेवक विनायक शिंदे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आर व्ही पाटील, श्री. पिंपळादेवी विद्यालयाचे संचालक एस बी पाटील, एस डी बाविस्कर, उपमुख्याध्यापक के आर सावंत, पर्यवेक्षक एस एस पाटील, जिल्हा न्यु हौशी सेपक टाँकरा असोसिएशनचे अध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष अविनाश वाघ, जिल्हा क्रीडा महासंघाचे अध्यक्ष महेश घुगरी, सचिव पंढरीनाथ बडगुजर, राज्य खो-खो क्रीडा मार्गदर्शक गुरुदत्त चव्हाण, महानगर खो-खो चे कोषाध्यक्ष भरतभाई ठाकूर, कला व क्रीडा शिक्षक समन्वय समितीचे अध्यक्ष हेमंत भदाणे, सचिव राहूल पाटील, जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशनचे सचिव योगेश वाघ, हौशी शुटींगबॉलचे महेंद्र गावडे, राष्ट्रीय नेटबॉल खेळाडू निलेश चौधरी, हर्षल भदाणे, ऋत्विक ठाकूर,चेतन पाटील आदींनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# सि. गो. पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठाच्या कुस्ती संघात निवड

**साक्री । प्रतिनिधी**

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुस्ती संघात सि. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील कु. कीर्ती गुंडलेकर हिची ५३ किलो वजन गटात तर अर्शद पिंजारी याची ६० किलो वजन गटात निवड झाली आहे. फैजपूर येथे नुकत्याच झालेल्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेतून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ निवडण्यात आला.

२८ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर दरम्यान आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा चंदिगड विद्यापीठ, मोहली येथे होणार आहेत. या स्पर्धेत कु. कीर्ती गुंडलेकर व अर्शद पिंजारी हे क.ब.चौ. उ.म.वि. चे प्रतिनिधित्व करतील. यांच्या निवडीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील, अध्यक्षा मंगलाताई सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, आय.क्यु.एस.सी समन्वयक डॉ. डी एस चव्हाण यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकांनी अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. हसिनखाँ तडवी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०२३




# धुळ्यातील कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी भक्तांची गर्दी

## मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



















धुळे।
कार्तिक पौर्णिमेनिमित्त शहरातील चाळीसगाव रोडवरील गिता जिनींग व प्रेसिंग कारखान्याच्या आवारातील श्री. कार्तिक स्वामींचे मंदिर उघडण्यात आले होते. भाविकांना व्यवस्थीत दर्शन घेता यावे, यासाठी मंदिर व्यवस्थापनाने युध्द पातळीवर तयारी केली होती. कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी महिलांसह नागरिकांची रांग लागली होती. (दि. २७) रात्री उशीरापर्यंत भाविकांनी दर्शन घेतले. मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले. हे मंदिर भाविकांसाठी वर्षातून एकदाच खुले होत असल्याने कार्तिक स्वामींचे दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांसह नागरिकांची याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या पिढीतील या मंदिरात दरवर्षी भाविकांची प्रचंड गर्दी होत असल्याने आवश्यक त्या ठिकाणी प्रखर झोत फेकणारे दिवे, बॅरिकेटस लावण्यात आले होते. धुळे येथील चाळीसगाव रोड लगत गिता जिनींग व प्रेसिंग कारखाना आहे. पूर्वीच्या बिजेराम डेडराज ऑईल मिल आवारात शेठ पन्नालाल जीवनराम अग्रवाल यांनी संवत १९८२ श्रावण शुध्द अष्टमीच्या दिवशी श्री. महादेव मंदिराची स्थापना केली. याच वेळी या जुन्या पध्दतीच्या घुमट आकाराच्या मंदिरात गणपती, शिवशंकर, पार्वती माता व हनुमानजी यांच्या आकर्षक अशा संगमरवरी मुर्तीसह श्री. कार्तिक स्वामीच्या मुर्तीची स्थापना झाली. तेव्हा पासून या ठिकाणी येणार्या भाविकांची नंतरच्या काळात श्रध्दा दृढ होत गेली. हे मंदिर जागृत असल्याची भावना निर्माण झाल्याने दरवर्षी या मंदिरात सतत महिला व पुरुषांची गर्दी वाढतच राहिली आहे. या पार्श्वभूमीवर मंदिराचे प्रमुख भरत अग्रवाल यांनी यंदाही भाविकांच्या सुविधेसाठी योग्य ती व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले होते.

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक





# मानवी भावभावनांचा हुंदका 'गोदो वन्स अगेन'

## राज्य नाट्य स्पर्धेत जळगाव शहरातील छत्रपती संभाजीराजे नाट्यगृहात सादर















जळगाव

। सॅम्युअल बॅकेटने जागतिक रंगभूमीवर अजरामर केलेले नाटक म्हणजे 'वेटिंग फॉर गोदो' त्यात दुसऱ्या महायुद्धानंतरची अनिश्र्चितता व त्यामुळे माणसांमध्ये मानसिक व शारीरिक पातळीवर उठलेली आंदोलने आणि कुणीतरी यातून आपली सुटका करेल, असा आशय मांडण्यात आला होता. या नाटकाला समांतर परंतु त्याचा पुढील टप्पा असलेले नाटक म्हणजे 'गोदो वन्स अगेन' हे भगवान हिरेलिखित व पंकज सनेर दिग्दर्शित नाटक भुसावळ थर्मल पॉवर स्टेशन, भुसावळ यांनी राज्य नाट्य स्पर्धेचे दुसरे पुष्प गुंफताना शनिवारी शहरातील छत्रपती संभाजीराजे नाट्यगृहात सादर केले. 'वेटिंग फॉर गोदो' या नाटकात गोदोचे पात्र आभासी होते. ते रंगमंचावर कधी येतच नाही; पण तो रंगमंचावर यावा, या अपेक्षेत तो प्रयोग रंगायचा. 'गोदो वन्स अगेन'मध्ये मात्र सुरवातीपासूनच गोदो रंगमंचावर असतो. गोदो कधी जादूगाराच्या, तर कधी आणखी कुणाच्या तरी रूपात येऊन दीदी व गोगो या दोन पात्रांचा मानसिक, शारीरिक छळ करतो. त्यांनाही या अस्वस्थेपासून सुटका हवी असते व गोदो आपली सुटका करण्यासाठी आला आहे, अशी त्यांची धारणा असते. त्यामुळे ते गोदोचा छळ सहन करतात. दीदी व गोगो या या दोघांच्या सुटकेसाठी गोदो विविध प्रलोभने दाखवतो. परंतु ती केवळ आभासीच ठरते. शेवटी मात्र गोगो व दीदीला असे वाटू लागते, की गोदो आला नसता तर बरे झाले असते. गोदो म्हणजे माणसाची आशा, आशा कधीही संपणारी नसते हेच 'गोदो वन्स अगेन'चे सूत्र आहे.